12 OCT 2022 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विवेकानंद, न्यू कॉलेज, 'डी. वाय. पाटील'ची बाजी

## जिल्हास्तरीय युवा महोत्सवात ७६ महाविद्यालयांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज :** शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय ४२ व्या युवा महोत्सवात कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने सहा कलाप्रकारात प्रथम क्रमांक पटकावून बाजी मारली. शिवाजी विद्यापीठ, न्यू कॉलेज व डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजने प्रत्येकी तीन कला प्रकारात यश मिळविले. जिल्ह्यातील ७६ महाविद्यालयांतील १,३०० कलाकारांनी भाग घेतला होता.

स्पर्धेचा निकाल अनुक्रमे असा : लोककला- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर; कन्या महाविद्यालय इचलकरंजी, व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी. लोकनृत्य- आजरा महाविद्यालय, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, कर्मवीर हिरे कॉलेज गारगोटी.

मूकनाट्य- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, भारती विद्यापीठ इंजिनिअरिंग कॉलेज कोल्हापूर, कॉमर्स कॉलेज कोल्हापूर. नकला- राजाराम कॉलेज कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, डी.वाय. पाटील कॉलेज कोल्हापूर.

वक्तृत्व मराठी- भोगावती महाविद्यालय कुरकली, यशवंतराव चव्हाण कॉलेज हलकर्णी, विवेकानंद कॉलेज. हिंदी- विवेकानंद कॉलेज , न्यू कॉलेज , शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर. इंग्रजी- विवेकानंद कॉलेज, के.आय.टी. कॉलेज कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ.

समूहगीत- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, कॉमर्स कॉलेज कोल्हापूर, पथनाट्य- आनंदी फार्मसी कॉलेज कळंबे तर्फ कळे, दूधसाखर महाविद्यालय बिद्री, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर. प्रश्नमंजूषा- तात्यासाहेब कोरे इंजिनिअरिंग कॉलेज वारणानगर, डी.वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, महावीर महाविद्यालय कोल्हापूर.



गडहिंग्लज येथील डॉ.घाळी महाविद्यालयात आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील लोकनृत्य प्रकारातील एक क्षण.

### आटपाडीत मध्यवर्ती महोत्सव

१६ ते १८ ऑक्टोबरअखेर मध्यवर्ती युवा महोत्सव आटपाडी येथील बाबासाहेब देसाई महाविद्यालयात होणार आहे.

12 OCT 2022 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अंतिम मतदार यादी आज प्रसिद्ध

## सिनेट निवडणूक : २५ जणांच्या हरकती; तयारीची गती वाढणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट), विद्या परिषद या अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी १४ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. त्यासाठीच्या दुरुस्त मतदार यादीवर एकूण २५ जणांनी हरकती नोंदविल्या होत्या. त्यावरील सुनावणीची प्रक्रिया शुक्रवारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या उपस्थितीत पूर्ण झाली. अंतिम मतदार यादी आज, बुधवारी सायंकाळी प्रसिद्ध होणार आहे.

या दुरुस्त मतदार यादीमध्ये



कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ३६ हजार ३४३ पदवीधर मतदार पात्र ठरले आहेत. या दुरुस्त यादीवर कुलगुरूंकडे एकूण २५ हरकतींची नोंद झाली. त्यात कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, प्राचार्य, अभ्यास मंडळाच्या यादींमध्ये मतदार म्हणून नावे समाविष्ट करण्याची मागणी केली. या हरकतींवर शुक्रवारी शिर्के यांच्या उपस्थितीत सुनावणी झाली. विद्या परिषदेतील आठ अध्यापक निवडणुकीसाठी प्रत्येक विद्याशाखेचे आरक्षण हे चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे निश्चित करण्यासाठी गुरूवारी बैठक होणार असल्याचे डॉ. विलास शिंदे यांनी सांगितले. दरम्यान, या निवडणुकीच्या मैदानात विद्यापीठ विकास आघाडी, विद्यापीठ विकास मंच आणि विद्यापीठ शिक्षक संघ, आजी-माजी विद्यार्थी कृती समिती, आदी संघटना उतरल्या आहेत.

पुढारी

# स्टार्ट अप यात्रा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**कोल्हापूर :** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या वतीने शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागात शुक्रवारी (दि. १४ ) महाराष्ट्र स्टार्ट अप यात्रा जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर व सादरीकरण सत्राचे आयोजन केले आहे. नावीन्यपूर्ण संकल्पना असणाऱ्यांनी या शिबिरात नवकल्पना नोंदवाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल रेखावार व कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे साहाय्यक आयुक्त संजय माळी यांनी केले आहे. या प्रशिक्षण शिबिरात पहिल्या सत्रात विविध योजनांची माहिती, स्टार्टअपच्या प्रवासातील टप्पे याबाबत मार्गदर्शन व स्थानिक उद्योजकांची व्याख्याने होणार आहेत. अधिक माहितीकरिता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दूरध्वनी क्रमांक ०२३१-२५४५६७७ येथे संपर्क साधावा. तसेच नवसंकल्पनाची (स्टार्टअप) www.msins.in qH$dm www.mahastartupyatra.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले.

पुढारी

# कॉमर्स कॉलेजमध्ये शिष्यवृत्ती योजनांबद्दल मार्गदर्शन शिबिर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांबद्दल मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या विशेष कक्षाचे उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव यांनी शिष्यवृत्ती व योजनांची माहिती दिली. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक प्रा. अतुल जाधव यांनी केले. डॉ. आय. एस मुल्लाणी यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# कॉमर्स महाविद्यालयात विविध शिष्यवृत्ती योजनांबद्दल मार्गदर्शन

**कोल्हापूर :** येथील देशभक्त रत्नाप्पा कुंभार महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या केंद्र व राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांबद्दल मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या विशेष कक्षाचे उप कुलसचिव डॉ. पी. एस. पांडव यांनी सर्वच प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजना, संशोधन शिष्यवृत्ती, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध शिष्यवृत्ती, वसतिगृह निर्वाह भत्ता योजना, सर्वसाधारण, आर्थिक दुर्बल, गुणवंत खेळाडू, शहीद सैनिकांच्या पाल्यांसाठी आणि प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या विविध शिष्यवृत्ती आणि योजनांचा आढावा घेतला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. अतुल जाधव यांनी, तर डॉ. आय. एस. मुल्लाणी यांनी आभार मानले.

12 OCT 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेजची बाजी

## जिल्हास्तरीय युवा महोत्सव; दत्ताजीराव कदम व न्यू कॉलेजचे विद्यार्थीही चमकले




गडहिंग्लज : घाळी महाविद्यालयात झालेल्या युवा महोत्सवात कला सादर करताना स्पर्धक विद्यार्थी.

गडहिंग्लज, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाचा ४२ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव उत्साहात झाला. येथील डॉ. घाळी महाविद्यालयाने महोत्सवाचे संयोजन केले होते. १५ कलाप्रकारांत ७६ महाविद्यालयांतील १२६५ स्पर्धक विद्यार्थ्यांनी सहभागी होत आपली कला सादर केली. यात विवेकानंद कॉलेजच्या (कोल्हापूर) विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करीत बाजी मारली. त्याखालोखाल दत्ताजीराव कदम कॉलेज (इचलकरंजी) व न्यू कॉलेजचे (कोल्हापूर) विद्यार्थी चमकले. विशेष म्हणजे पावसातही विद्यार्थ्यांच्या उत्साहाला भरते आले होते.

कलाप्रकारनिहाय अनुक्रमे विजेते असे- (लोककला)- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, श्रीमती अक्काताई पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी. (लोकनृत्य)- आजरा महाविद्यालय आजरा, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, कर्मवीर हिरे महाविद्यालय गारगोटी. (मूकनाट्य)- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर. (नकला)- राजाराम कॉलेज कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर. (मराठी वक्तृत्व)- भोगावती महाविद्यालय कुरुकली, यशवंतराव चव्हाण कॉलेज हलकर्णी, विवेकानंद कॉलेज. (हिंदी वक्तृत्व)- विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर. (इंग्रजी वक्तृत्व)- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, के. आय. टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

(वादविवाद)- डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, के. आय. टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर. (सुगम गायन)- न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर. (लोकसंगीत वाद्यवृंद)- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर. (लघुनाटिका)- शिव-शाहू महाविद्यालय सरुड, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर. (एकांकिका)- शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर. (समूह गीत)- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज कोल्हापूर. (पथनाट्य)- आनंदी बी फार्मसी कॉलेज कळंबे तर्फ कळे, दूधसाखर महाविद्यालय बिद्री, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर. (प्रश्नमंजूषा)- तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग वारणानगर, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर, महावीर महाविद्यालय कोल्हापूर.

### आटपाडीत मध्यवर्ती महोत्सव

शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव १६ ते १८ ऑक्टोबर या कालावधीत होणार आहे. आटपाडी येथील श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय संयोजक आहे. जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील प्रथम तीन विजेते महाविद्यालये मध्यवर्ती युवा महोत्सवात प्रतिनिधित्व करतील.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात आज राष्ट्रीय कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभाग आणि कॉम्रेड दत्ता देशमुख अध्यासनाच्या संयुक्त विद्यमाने उद्या (ता.१२) 'भारतीय लोकशाही : बहुसंख्यांकवादी की बहुलतावादी' या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. मानव्यशास्त्र विभागाच्या सभागृहात दुपारी एक ते चार या वेळेत ही कार्यशाळा होणार असून त्यासाठी सकाळी अकरा वाजता नोंदणी करावी, असे आवाहन राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी केले आहे.

पहिल्या सत्रात दुपारी एक वाजता सकाळ माध्यम समूहाचे संपादक संचालक व राजकीय विश्लेषक श्रीराम पवार संवाद साधतील. अध्यक्षस्थानी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या प्रा. डॉ. भारती पाटील असतील. दुसऱ्या सत्रात दुपारी अडीच वाजता ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ संवाद साधतील. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. अशोक चौसाळकर असतील.

तरूण भारत

# विद्यापीठ निवडणूक मतदारांची आज अंतिम यादी होणार जाहीर

- शुक्रवारी उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असून विविध अधिकार मंडळासाठी १४ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. मतदार अर्जांची छाननी प्रक्रिया संपली असून आज बुधवार, १२ रोजी अंतिम मतदारयादी प्रसिध्द होईल. तर शुक्रवार, १४ रोजी निवडणूक सूचना प्रसिध्द झाल्यानंतर २८ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरले जातील. प्रत्यक्ष मतदानाला अवघा महिनाभर राहिल्याने सर्वच विद्यार्थी, प्राध्यापक, संस्थाचालक, प्राचार्य संघटनांच्या बैठकांनी जोर धरला आहे.



शिवाजी विद्यापीठ निवडणुकीसाठी २८ रोजी उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख आहे. ३१ राजी उमेदवारी अर्जांची छाननी होणार आहे. १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घ्यावयाचे आहेत. २ नोव्हेंबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी अर्जांच्या वैधतेबाबत कुलगुरूंकडे तक्रार करावी. ३ नोव्हेंबर रोजी अंतिम पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द होईल. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रत्यक्ष मतदान होईल. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरूवात होणार असून निकाल जाहीर होईल. पात्र उमेदवारांना प्रचार करण्यासाठी आवघे दहा दिवस मिळणार आहेत. त्यामुळे आतापासूनच इच्छुकांसह संघटनांनी प्रचाराला सुरूवात केली आहे.

तरुण भारत

# कॉमर्स महाविद्यालयामध्ये शिष्यवृत्ती योजनांबद्दल मार्गदर्शन

**कोल्हापूर :** येथील देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या केंद्र व राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांबद्दल मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या विशेष कक्षाचे उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव यांनी सर्वच प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजना, संशोधन शिष्यवृत्ती, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध शिष्यवृत्ती, वसतिगृह निर्वाह भत्ता योजना, सर्वसाधारण, आर्थिक दुर्बल, गुणवंत खेळाडू, शहीद सैनिकांच्या पाल्यांसाठी आणि प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या विविध शिष्यवृत्ती आणि योजनांचा आढावा घेतला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. अतुल जाधव यांनी तर डॉ. आय. एस. मुल्लानी यांनी आभार प्रदर्शन केले.